# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १०
## सभावृत्तांत

दिनांक - १२.०६.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक १२.६.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.जम सोनाली पोपट
५) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
६) मा.पाडाळे निता विलास
७) मा.जावेद रमजान शेख
८) मा.जगताप नवनाथ दत्तु
९) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१०) मा.चोंधे आरती सुरेश
११) मा.भालेकर अरुणा दिलीप
१२) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह आयुक्त,मा.झुरे,मा.कारचे, मा.ढेरे,मा.गायकवाड,मा.पवार,मा.बंब,मा.दुरगुडे-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक, मा.चाकणकर-प्र.नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.चव्हाण-सह शहर अभियंता,मा.चिंचवडे,मा.ढगे,मा.जाधव,मा.जाधव,मा.कुदळे, मा.कपिले, मा.खाबडे-कार्यकारी अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.), मा.पवार-प्र.कायदा सल्लागार मा.चोरगे-भांडार अधिकारी, मा.गायकवाड-लेखाधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-

विषय क्रमांक :- २४) श्री संत तुकाराम महाराज यांच्या आषाढीवारी पालखी सोहळ्याबाबत...

विषय क्रमांक :- २५) जाहिरात रोटेशन धोरण सन २०१२-१३चे निश्चित करणेबाबत...

विषय क्रमांक :- २६) पिंपरी भाजी मंडई येथील गाळा मनपाने ठरविलेल्या दराने देणेबाबत-मा.सोनाली जम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२७) पिंपरी भाजी मंडई येथील गाळा भाडेतत्वावर देणेबाबत - मा.सोनाली जम, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२८) पत्रकारांना अंदाजपत्रक ठेवण्यासाठी बॅग देणेबाबत - मा.सोनाली जम, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-२९) पवना नदी सुधारणांअंतर्गत नदीच्या दोन्ही बाजूस रावेत ते दापोडी पर्यंत १८ मी.चा रस्ता विकसित करणेबाबत - मा.निता पाडाळे, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३०) क्रीडा प्रबोधिनी शाळेत मानधनावर क्रीडा कोच नेमणुकीबाबत - मा.राहुल भोसले, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३१) मा.स्थायी समिती ठ.क्र.१६६७८ रद्द करणेबाबत व हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टम राबविणेबाबत- मा.राहुल भोसले, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३२) दि.२३ जून रोजी जागतिक ऑलिंपिंक दिनानिमित्त ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजन करणेबाबत - मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३३) श्री संततुकाराम महाराज पालखीकरिता ध्वनीक्षेपण व्यवस्था, विद्युत रोषणाई, प्रकाश व्यवस्था करणेबाबत - मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३४) संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याकरिता एच ए ग्राऊंड या ठिकाणी प्रकाश व्यवस्था, स्पिकर व्यवस्था व जनरेटर व्यवस्था करणेबाबत - मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३५) ड प्रभाग येथील कामाकरीता सल्लागार यांची फी देण्याकरीता येणारे खर्चास मान्यता देणेबाबत-मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३६) ड प्रभाग येथील कामांकरीता सल्लागार यांची फीचे खर्चास मान्यता देणेबाबत - मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३७) उद्यान देखभालीसाठी चालविणेस देणेबाबत - मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३८) प्राण्यांचे करीता अनाथालय/संगोपन केंद्र सुरु करणेबाबत - मा.सोनाली जम, मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-३९) संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज दि. ११/६/१२ रोजी पालखीचे आगमनाच्या वेळी स्वागत समारंभ व मुक्काम या ठिकाणी ध्वनीक्षेपण मुक्काम व प्रकाश व्यवस्था करणेबाबत...

विषय क्रमांक :-४०) सन २०११ ते २०१४ या कालावधीसाठी आर्किटेक्ट पॅनेलवर पी.के.दास आणि असोसिएटस् यांची नेमणुक करणेबाबत - मा.आरती चोंधे, मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक :-४१) म.न.पा.चे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचिंग स्टेशन उभारणेकरिता जागा म.रा.वि. वितरण कंपनीकडे हस्तांतरित करणेबाबत...

विषय क्रमांक :-४२) शाहूनगर येथील व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर देणेबाबत - मा.नवनाथ जगताप, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव...

--------

उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे विषय क्रमांक १,२,३,४,५,६,७,८,९,११, १२,१३,१४,१५,१७,१८,१९,२०,२१,२२,२३,२४,२५,२६,२७,२८,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६, ३७,३८,३९,४०,४१,४२,१०,१६ या क्रमाने कामकाजाच्या बाबी विचारार्थ घेणेत येतील असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

--------

ठराव क्रमांक -५८५ विषय क्रमांक - १
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - झोनिपू स्थापत्य
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भः-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपू/स्था/नि/काvि/२१२/१२ दि.१/६/२०१२
विषय - निविदा नोटीस क्र.१/६०-२०११/१२ चे कामाचा करारनामा अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५८६ विषय क्रमांक - २
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - झोनिपू स्थापत्य
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपू/स्था/नि/कावि/२१३/१२ दि.१/६/२०१२
विषय - निविदा नोटीस क्र.१/१०-२०११/१२ चे कामाचा करारनामा अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५८७ विषय क्रमांक - ३
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - झोनिपू स्थापत्य
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपू/स्था/नि/ कावि/२१४/१२ दि.१/६/२०१२
विषय - निविदा नोटीस क्र.१/५३-२०११/१२ चे कामाचा करारनामा अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५८८ विषय क्रमांक - ४
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - झोनिपू स्थापत्य
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त यांचे जावक क्र.झोनिपू/स्था/नि/ कावि/२१५/१२ दि.१/६/२०१२
विषय - निविदा नोटीस क्र.१/११-२०११/१२ चे कामाचा करारनामा अवलोकन करणेबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५८९ विषय क्रमांक - ५
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - करआकारणी व करसंकलन
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कर/मुख्य/०५/कावि/२८२/१२ दि.२/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मिळकतकर वसुली कामकाजासाठी वाहने भाडेतत्वावर घेणेकामी प्रस्तावात नमुद केलेली ८ भाडोत्री वाहने करसंकलन विभागाच्या विभागीय कार्यालयांसाठी मिळकतकर वसुलींचे कामकाजाकरिता दि.७/३/१२ ते ३१/३/१२ अखेर भाडेतत्वावर घेणेत आलेली आहेत. तातडीची बाब लक्षात घेता व अल्पकालावधी असलेने करारनामा न करता थेट पध्दतीने आर.टी.ओ., पुणे यांचेकडील मंजूर दरानुसार येणारा प्रत्यक्ष खर्चास तसेच सदर वाहनाचे भाडे अदा करणेकामी अंदाजे र.रू.२,१५,०००/- खर्च होणार आहे. करसंकलन विभागाकडे वाहन भाड्याने घेणे या लेखार्षावर र.रू.२,००,०००/- सन २०१२-१३ साठी तरतूद करणेत आली आहे. मिळकत सर्वेक्षण या लेखाशिर्षावर र.रू.३,००,०००/- तरतूद असून त्यापैकी र.रू. १५,०००/- वाहने भाड्याने घेणे या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९० विषय क्रमांक - ६
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - मुख्यलेखापरिक्षण
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:-मा.मुख्यलेखापरिक्षक यांचे जावक क्र.मुलेप/१/कावि/६४१/१२ दि.२/६/२०१२

मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९१ विषय क्रमांक - ७
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - संगणक
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.संगणक/६/कावि/१९८/१२ दि.४/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया ही केंद्रशासन अंगीकृत संस्था असल्याने केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दराने निविदा न मागविता परंतू करारनामा करून थेट पध्दतीने कामकाज करणेस व दि.१/४/२०११ ते ३०/३/२०१२ या कालावधीचे एकूण र.रू.९,९२,७००/- [र.रू.नऊ लाख ब्यान्नव हजार सातशे] चे खर्चास कार्योत्तर व दि.१/४/२०१२ ते ३०/६/२०१२ या ३ महिने कालावधीसाठी बँडविड्थ चार्जेस व ८ कार्यालये मुख्यकार्यालयाशी जोडणेकामी एकूण र.रू.७,२८,६५५/- [र.रू.सात लाख अठ्ठावीस हजार सहाशे पंचावन्न] चे कामकाज निविदा न मागविता परंतू करारनामा करून थेट पध्दतीने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९२ विषय क्रमांक - ८
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - कायदा
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/१६०/१२ दि.२/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

ना.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठाने निरनिराळ्या प्रकरणी दिलेल्या निकालांची एकत्रित माहिती असलेले सॉफ्टवेअर बॉम्बे केसेस इन्फोटेक प्रा.लि. व सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निकालांची माहिती व महाराष्ट्र लोकल ॲक्ट, डिजीलिगल सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेकडून कायदा विभागाचे संगणकावर बसविणेत आले असून करारनामा न करता थेट पध्दतीने सदरचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यास मान्यता दिलेली असून मे.बॉम्बे केसेस इन्फोटेक प्रा.लि. यांचेकडील बॉम्बे केसेस सर्च ची सन २०१० ची माहिती अपडेशन करण्यास व अपडेशन चार्जेस र.रू.२,५००/- अधिक ५ % व्हॅट र.रू.१२५/- एकूण र.रू. २,६२५/- चे खर्चास कार्योत्तर तसेच जानेवारी २०११ ते डिसेंबर २०१२ ची माहिती अपडेशन करण्यास व अपडेशन चार्जेस र.रू.५,०००/- अधिक ५ % व्हॅट र.रू.२५०/- एकूण र.रू.५,२५०/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक -५९३ विषय क्रमांक - ९
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/२/कावि/१३१/१२ दि.४/६/२०१२
विषय - मनपाच्या विविध विभागाकडील उपलब्ध २०५५ डी एन प्रिंटरचे टोनर खरेदीबाबत...

विषय क्रमांक ९चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९४ विषय क्रमांक - ११
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - कायदा सल्लागार
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक:- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.कास/६/कावि/१३०/१२ दि.५/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथील आकुर्डी न्यायालयातील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग व नियुक्त कर्मचारी यांचे सन २०११-१२ चे न्यायालयीन आस्थापना खर्चाचे प्रतिपुर्तीची रक्कम (एक महिन्याची र.रू.४,५५,२६८/-X १२) र.रू.५४,६३,२१६/- सदरचे वेतन व भत्ते अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९५ विषय क्रमांक - १२
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/६८४/१२ दि.३/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलशुध्दीकरण केंद्र से.२३ येथे २५ % वाढीव पावडर पी.ए.सी. चा पुरवठा घेणेकामी २५ % वाढीव पुरवठा म्हणजेच ५४ मे.टनासाठी र.रू.१६,२५,४००/- [र.रू.सोळा लाख पंचवीस हजार चारशे] खर्च येणे अपेक्षित असून सदरचे काम मे.केमिकल पीपल्स व मे.एस.व्ही.एस.केमिकल्स यांचेकडून अनुक्रमे ३०: ७० याप्रमाणात करून घेण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९६ विषय क्रमांक - १३
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - स्थापत्य
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/बीआरटीएस/१६८/१२दि.४/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या मागील तीन आर्थिक वर्षात मनपाची सुधारलेली आर्थिक परिस्थिती विचारात घेवून जागतिक बँकेकडून [१)डांगे चौक येथे उड्डाणपूल बांधणे र.रू.१० कोटी, २)बीआरटीएस बसस्टॉप व बसमध्ये ITS यंत्रणा उभी

करणे र.रू.७ कोटी ३)तीन बस टर्मिनल व पार्कींग विकसित करणे र.रू.१२ कोटी ४)मुंबई पुणे व औंध-रावेत बीआरटीएस रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी सुविधा निर्माण करणे र.रू.१० कोटी) असे एकूण र.रू.३९.०० कोटी इतके कर्ज कमी करणेकामीची बाब अवलोकनार्थ मा.महापालिका सभेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९७ विषय क्रमांक - १४
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/१/कावि/५१६/१२दि.६/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे मनपाकडील मा.मुख्यलेखापाल, मा.कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांच्या वापराकरीता नविन टाटा इंडिका व्हिस्टा व प्रशासन अधिकारी (क प्रभाग) आणि सहा.आरोग्य अधिकारी (क प्रभाग) यांच्या वापराकरीता नवीन सुमो वाहने एकूण चार वाहने निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने स्पेशल गव्हरमेंट प्राईज प्रमाणे टाटा इंडिका व्हिस्टा VX (Quadrjet BS४ with Exice Duty) करिता प्रति वाहन र.रू.५,३७,८७७/- प्रमाणे दोन वाहनांची एकूण किंमत र.रू.१०,७५,७४४/- व टाटा सुमो गोल्ड (CX BS४ with Exicise Duty) प्रति वाहनाची किंमत र.रू. ५,४१,३२७/- प्रमाणे दोन वाहनांची एकूण किंमत र.रू. १०,८२,६५४/- अशी एकूण र.रू.२१,५८,३९८/- मे.टाटा मोटर्स लि.यांना आगाऊ स्वरूपात अदा करून खरेदीसाठी झालेल्या रकमेचे तसेच इतर खर्चाकरिता चार वाहनांसाठी झालेल्या र.रू.४५,०००/- या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९८ विषय क्रमांक - १५
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - वाहन दुरुस्ती कार्यशाळा
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.काशा/१/कावि/५१५/१२दि.६/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे मनपाकडील मा.अति.आयुक्त, मा.शहर अभियंता (स्थापत्य), मा.सह शहर अभियंता (पाणीपुरवठा) यांच्या कार्यालयीन वापराकरीता तीन नग टाटा मांझा (Aqua Safire BS४ with Excise Duty) व दूरसंचार विभागाकरीता एक नग टाटा सुमो गोल्ड CX BS४ एकूण चार वाहने निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने स्पेशल गव्हरमेंट प्राईज प्रमाणे टाटा मांझा वाहनाकरिता प्रतिवाहन र.रू.५,३३,१२२/- प्रमाणे तीन वाहनांचे र.रू.१५,९९,३६६/- व सुमो वाहनांकरिता र.रू.५,४१,३२७/- असे एकूण र.रू.२१,४०,६९३/- मे.टाटा मोटर्स लि.यांना आगाऊ स्वरूपात अदा करून खरेदीसाठी झालेल्या रकमेचे तसेच इतर खर्चाकरिता चार वाहनांसाठी झालेल्या र.रू.४५,०००/- या खर्चाचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -५९९ विषय क्रमांक - १७
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - माध्यमिक शिक्षण
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/४०३/१२दि.६/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मार्च-१२ एसएससी परिक्षेत ८५ % पेक्षा जास्त गुणे घेणाऱ्या मनपा माध्यमिक विद्यालयांतील विद्यार्थ्यांस प्रस्तावात नमुद प्रमाणे रोख रक्कम धनादेशाव्दारे अदा करणेस व सदर कार्यक्रम मनपा नाट्यगृहात घेण्यात येणार असल्यामुळे नाट्यगृह भाडे, सत्कार समारंभाकरिता पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ, बॅनर, भेटवस्तु, चहापान उद्घाटन इत्यादी खर्चासाठी अंदाजे खर्च र.रू.२५,०००/- थेट पध्दतीने खुल्या बाजारातून कोटेशन न मागविता, करारनामा न करता करावा लागणार असल्याने सदर खर्चास व प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०० विषय क्रमांक - १८
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - पाणीपुरवठा व जलनि:सारण
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील अनुमोदक :- मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/६९२/१२दि.६/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलनिःसारण विभागाकडील नि.नो.क्र.JNNURM/१/१/२०१२-१३ चे जाहीरात प्रसिध्दी खर्चापोटी दै.द इंडियन एक्सप्रेस व दै.लोकसत्ता यांना एकत्रित बिल र.रू.५,४२,४००/- [र.रू.पाच लाख बेचाळीस हजार चारशे] अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०१ विषय क्रमांक - १९
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - जलशुद्धीकरण केंद्र से.२३
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/६९१/१२दि.६/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलशुध्दीकरण केंद्र से.२३ येथे २५ % वाढीव द्रवरूप पी.ए.सी. चा पुरवठा घेणेकामी २५ % वाढीव पुरवठा म्हणजेच २२५ मे.टनासाठी र.रू.२७,४५,०००/- [र.रू.सत्तावीस लाख पंचेचाळीस हजार] खर्च येणे अपेक्षित असून सदरचे काम मे.केमिकल पीपल्स व मे.एस.व्ही.एस.केमिकल्स यांचेकडून अनुक्रमे ३० : ७० याप्रमाणात करून घेण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०२ विषय क्रमांक - २०
दिनांक - १२/६/२०१२ विभाग-यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वायसीएमएच/१/कावि/१०९/१२
दि.२५/५/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयातील एक्सरे विभागा मध्ये काम करणारे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मे.रेननटेक लॅब्रोटरीज प्रा.लि., गिरगांव, मुंबई यांनी सादर केलेले ॲडव्हान्स बिल र.रू.१७,४६०/- [र.रू.सतरा हजार चारशे साठ] त्यांना अदा करावयाचे असलेने सदरचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०३ विषय क्रमांक - २१
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:-१) मा.रामदास बोकड, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ६/६/२०१२ ठराव क्र.९
विषय- म.न.पा.ची कै. मधुकर पवळे व्यायाम शाळा, यमुनानगर निगडी ही व्यायाम शाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत...

विषय क्रमांक २१चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०४ विषय क्रमांक - २२
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:-१) मा.निलेश पांढरकर,मा.शांताराम भालेकर यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ६/६/२०१२ ठराव क्र.१०
विषय - व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेबाबत...

विषय क्रमांक २२चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -६०५ विषय क्रमांक - २३
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.अश्विनी चिंचवडे-पाटील
संदर्भ:-१) मा.शांताराम भालेकर, मा.निलेश पांढरकर यांचा प्रस्ताव...
२) मा.क्रिडा समिती सभा दिनांक ६/६/२०१२ ठराव क्र.११

दिनांक २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिन जगभरात मोठया प्रमाणात साजरा केला जातो. सन २०१२ च्या ऑलिंपिक स्पर्धा इंग्लड यंथे आयोजित करण्यात येत आहेत. पिंपरी चिंचवड शहरामध्ये विविध क्रिडा प्रकारामध्ये खेळाडू पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक वाढवित आहे. जागतिक ऑलिंपिक दिन व यावर्षी होणा-या

ऑलिंपिक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दि. २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिना निमित्त ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी जागतिक ऑलिंपिक दिन व यावर्षी होणा-या ऑलिंपिक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने म.न.पा.च्या वतीने दि.२३ जून रोजी ऑलिंपिंक ज्योत रॅलिचे आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६०६ विषय क्रमांक - २४
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - विद्युत
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विं/बप्र/जा/२९७/२०१२दि.८/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

संत तुकाराम महाराज प्रतिष्ठान संत तुकारामनगर पिंपरी येथे पालखी मुक्कामी तसेच एच.ए.मैदान येथे रींगन सोहळा असुन सदर ठिकाणी दि.११/६/१२ व १२/६/१२ रोजी प्रकाश व्यवस्था, ध्वनिक्षेपण व्यवस्था, जनरेटर व सी.सी.टी.व्ही व्यवस्था इ.कामांचा अंतर्भाव आहे. सदरचे काम मे.मोरया मंडप ॲण्ड डेकोरेटर्स यांच्या कडुन निविदा नोटीस क्र. २/९९-२०११/१२, नुसार १४.९५% कमी दराने करुन घेणेत येणार आहे. अंदाजे खर्च र.रु. १२२२४०/- (निविदा दर १४.९५% कमी म्हणजे र.रु. १८२७५/- वजा जाता र.रु. १०३९५६/-) इतका खर्च अपेक्षित असल्याने सदर कामी येणा-या खर्चास र.रु. १२२२४०/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६०७ विषय क्रमांक - २५
दिनांक - १२/६/२०१२ विभाग - जनतासंपर्क व स्वागत कक्ष
सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.जावेद शेख
संदर्भः-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जस/३/कावि/१७५/२०१२दि.६/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शासन मान्य यादीवर असणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य दराने जाहिराती देणेत येत असून यामध्ये अ,ब व क वर्ग वृत्तपत्रांचा समावेश असल्याने शासनमान्य दराने जाहिरात प्रसिध्द करणा-या प्रस्तावात नमुद वृत्तपत्रांना मनपाच्या यादीवर घेण्यास व शासनमान्य दराने जाहिराती वितरीत करण्यास तसेच जाहिरात रोटेशन ठरवण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्यास तसेच प्रस्तावात नमूदप्रमाणे अ.क्र. १ ते ८ रोटेशन यांस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६०८ विषय क्रमांक - २६
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.सोनाली जम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

मौजे पिंपरी भाजी मंडई येथील अनु क्रं. १३३ लगत ३८ व्यापारीक गाळे आहेत त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडे तत्वावर देण्यात आलेले आहे.

त्यामधील रिक्त गाळया पैकी गाळा क्र.११ हा श्री. यासीन ताजुद्दीन शेख राहणार मिलींद नगर, पिंपरी, पुणे-१७ यांना ५ वर्षे कालावधीकरीता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६०९ विषय क्रमांक - २७
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.सोनाली जम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

मौजे पिंपरी भाजी मंडई येथील अनु क्रं. १३३ लगत ३८ व्यापारीक गाळे आहेत त्यापैकी काही गाळे मनपा दराने भाडे तत्वावर देण्यात आलेले आहे. त्यामधील रिक्त गाळया पैकी गाळा क्र.५ हा श्री. ईम्रान सलीम अत्तार राहणार गांधी नगर, पिंपरी, पुणे-१८ यांना ५ वर्षे कालावधीकरीता मनपाने ठरविलेल्या दराप्रमाणे देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१० विषय क्रमांक - २८
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.राहुल भोसले
संदर्भ:-मा.सोनाली जम,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०११-१२ चे सुधारित व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक मुं.प्रां.महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये मा.स्थायी समिती सभेला सादर करावयाचे असते. सदर अंदाजपत्रक सादर केल्यानंतर पत्रकार परिषद आयोजित करण्यात येते. सदर पत्रकार परिषदेत पत्रकारांना अंदाजपत्रक ठेवण्यासाठी १ बॅग, १पॅड, १ पेनड्राईव्ह/अथवा इतर वस्तु देणे गरजेचे आहे. त्यासाठी अंदाजे र.रु. ६५,०००/- खर्च अपेक्षीत आहे. सदरचा खर्च निविदा न मागविता करारनामा न करता थेट पध्दतीने खरेदी करणेस व र.रु.६५,०००/- पर्यंत खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६११ विषय क्रमांक - २९
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.निता पाडाळे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत विकसित होणा-या पवना नदी सुधारणा प्रकल्पाअंतर्गत मनपाच्या विकास आराखडयानुसार रावेत पासून दापोडीपर्यंत मनपा हद्दीत पवना नदीच्या दोन्ही बाजूस १८ मीटर रुंदीचा रस्ता तयार करावा जेणेकरुन शहरातील वाढत्या वाहतुकीचा प्रश्न सुटण्यास मदत हाईल. तसेच नदीमध्ये राडारोडा टाकून नदीचे पात्र कमी होण्यास आळा बसेल. तरी याबाबतचे काम तातडीने हाती घ्यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१२ विषय क्रमांक - ३०
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:-मा.राहुल भोसले, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागामार्फत क्रीडा प्रबोधिनी (स्पोर्टस स्कूल) चालविणेत येतात. सदर क्रीडा प्रबोधिनीला कबड्डी, खो खो व माध्यमिक विद्यालय फुगेवाडीला योगा खेळाच्या कोचची आवश्यकता आहे. त्या शाळेत मानधनावर शिक्षकांची यापुर्वी नेमणुक केलेली होती आता त्यांची मुदत संपलेली आहे म्हणून याकामी श्री. दिनेश देशमुख कबड्डी कोच, श्रीमती स्वाती जगदाळे, योगा कोच, श्री, अविनाश करवंदे खो खो कोच यांची आदेशाच्या दिनांकापासून ०६ महिने कालावधीकरीता र.रु.१०,०००/- प्रति महिना प्रति कोच याप्रमाणे मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१३ विषय क्रमांक - ३१
दिनांक - १२/६/२०१२
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.सोनाली जम
संदर्भ:-मा.राहुल भोसले, मा.सोनाली जम यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.१६६७८ दिनांक ३/१/२०१२ रद्द करणेत येत आहे. व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागांतर्गत असलेल्या दवाखाने/रुग्णालयामध्ये हेल्थ कार्ड मॅनेजमेंट सिस्टम राबविणेकामी निविदा क्रमांक १४/२००८-०९ अन्वये प्रसिध्द करुन त्यातील लघुत्तम निविदा धारक मे. अमृता टेक्नॉलॉजी प्रा.लि.यांनी दि.४/२/२०१० रोजी दिलेल्या रिव्हाईज्ड प्रपोजलानुसार व दि.२०/३/२०१० रोजी केलेल्या करारनाम्यास अधिन राहून ५ वर्ष कालावधीसाठी वार्षिक देखभाल दुरुस्तीकामी येणा-या र.रु. ६,१८,५९,२५२/- चे खर्चास किंवा येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१४ विषय क्रमांक - ३२

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

दिनांक २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिन जगभरात मोठया प्रमाणात साजरा केला जातो. सन २०१२ च्या ऑलिंपिंक स्पर्धा इंग्लंड येथे आयोजित करण्यात येत आहे. पिंपरी चिंचवड शहरामध्ये विविध क्रीडा प्रकारामध्ये खेळाडु पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकिक वाढवित आहे. जागतिक ऑलिंपिक दिन व यावर्षी होणा-या ऑलिंपीक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने मनपाच्या वतीने, दि. २३ जून रोजी जागतिक ऑलिंपिक दिना निमीत्त ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजन करण्यात येणार आहे. तरी जागतिक ऑलिंपिक दिन व यावर्षी होणा-या ऑलिंपिंक स्पर्धेची जनजागृती पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांमध्ये होण्याच्या दृष्टीने मनपाच्या वतीने, दि.२३ जून रोजी ऑलिंपिक ज्योत रॅलीचे आयोजनाकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१५ विषय क्रमांक - ३३

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

जगदगुरु श्री संततुकाराम महाराज पालखीचे आगमन दिनांक ११/६/१२ रोजी मनपा कार्यक्षेत्रामध्ये आगमन होणार असून दि. १२/६/१२ रोजी संततुकाराम पिंपरी १८ या ठिकाणी संततुकाराम महाराज मंदीरामध्ये मुक्काम होणार आहे सदर ठिकाणी ध्वनीक्षेपण व्यवस्था, विद्युत रोषणाई, प्रकाश व्यवस्था, सी.सी.टीव्ही व्यवस्था जनरेटरसह करणे आवश्यक आहे. प्रस्तुत कामासाठी येणारे रक्कम रु. १,२२,२४०/- (एक लक्ष बावीस हजार दोनशे चाळीस फक्त) चे खर्चास व सदर काम थेट पध्दतीने मे. मोरया मंडप डेकोरेटर्स चिंचवड यांचेकडुन विभाकडील चालु कामाचे निविदा दर १४.९५% कमी या दराने करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१६ विषय क्रमांक - ३४

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमध्ये संत तुकाराम महाराज यांची पालखी दि. ११/६/२०१२ रोजी आकुर्डी या ठिकाणी मुक्कामी येणार आहे तसेच दि. १२/६/२०१२ रोजी, पिंपरी एच ए ग्राऊंड या ठिकाणी पालखीचे रिंगण होणार असून ते पाहण्यासाठी सदरच्या ठिकाणी मोठया प्रमाणात वारकरी व नागरीक येतात तसेच या ठिकाणी दिंडयांचा मुक्काम होतो त्यांचे सोई व सुरक्षिततेसाठी या एच ए ग्राऊंडवर प्रकाश व्यवस्था, स्पिकर व्यवस्था व जनरेटर व्यवस्था करणे आवश्यक आहे हे काम गतवर्षी मे.

त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲंड अले. निगडी यांनी चांगल्या पध्दतीने काम केले होते तरी हे काम मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲंड इले.निगडी यांना पुर्व स्विकृत दरानेच याही वर्षीचे काम, करारनामा न करता देणेस व येणा-या प्रत्यक्ष खर्चास र.रु.१५००००/- (पुर्व स्विकृत दर २.७% कमी) या दराने करवुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१७ विषय क्रमांक - ३५

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील अ,ब,क,ड आणि एम.आय.डी.सी. मधील रस्त्यांच्या सुधारणा व डांबरीकरण आणि अनुषंगिक कामे करणे करीता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट मे पेव्हटेक कन्स्लटंट यांना स्थायी समिती ठराव क्र. १७६३१ दि. ८/३/२००७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. या पैकी ड प्रभाग येथील कामा करीता सल्लागार यांना स्टॅंडर्ड तक्त्याप्रमाणे २.३५% (अधिक सेवाकर) इतकी फी अदा करणेत मान्यता देण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामातील अडचणीमुळे ठेकेदाराच्या कामास मुदतवाढ देण्यात आल्याने या कालावधीत सल्लागार यांची फी देणेकरीता ३.०० टक्केपर्यंत फी अदा करणेची तरतुद सल्लागार यांचे करारनाम्यात आहे. याप्रमाणे प्रत्यक्ष कामाच्या खर्चावर र.रु. २२,००,०००/- (अधिक सेवा कर) इतकी वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१८ विषय क्रमांक - ३६

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील ड प्रभाग मधील रस्त्यांच्या सुधारणा व डांबरीकरण आणि अनुषंगिक कामे करणे करीता प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट मे पेव्हटेक कन्सल्टंट यांना स्थायी समिती ठराव क्र. १६६९ दि. ४/९/२००७ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. यापैकी ड प्रभाग येथील कामाकरीता सल्लागार यांना स्टॅंडर्ड तक्त्याप्रमाणे २.३५ % (अधिक सेवाकर) इतकी फी अदा करणेस मान्यता देण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामातील अडचणीमुळे ठेकेदाराच्या कामास मुदतवाढ देण्यात आल्याने या कालावधीत सल्लागार यांची फी देणेकरीता ३.०० टक्केपर्यंत फी अदा करणेची तरतुद सल्लागार यांचे करारनाम्यामध्ये आहे. याप्रमाणे प्रत्यक्ष कामाच्या खर्चावर र.रु. ११,००,०००/- (अधिक सेवा कर) इतकी वाढीव खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६१९ विषय क्रमांक - ३७

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.१७, पेठ क्र. २८ अ मधील श्री.संत ज्ञानेश्वर उद्यान हे श्री.बालाजी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत यांना मनपा दरानुसार ५ वर्षे कालावधीसाठी देखभालीसाठी चालविण्यास देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२० विषय क्रमांक - ३८

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.सोनाली जम,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिका हद्दीमध्ये ब-याचदा वाहनांचे अपघाताने अथवा अन्य कारणाने जखमी व अपंगावस्थेत रस्त्याच्या कडेला प्राणी पडलेले दिसून येतात. या प्राण्यांवर औषधोपचार तसेच त्यांचे संगोपन करणे करीता महानगरपालिकेमार्फत योग्य ठिकाणी गायरान जमीनीवर एक प्राणी अनाथालय/ संगोपन केंद्र सुरु करणेत यावे जेणेकरुन त्यामध्ये त्यांचेवर औषधोपचार करणे शक्य होईल. तसेच शहरामध्ये काही वेळा वन्य प्राणी देखील जखमी अवस्थेत पडल्याचे आढळून आलेले आहे त्यांचेवर देखील या केंद्राचे ठिकाणी औषधोपचार करणे शक्य होईल. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये वाहनांचे अपघाताने अथवा अन्य कारणाने जखमी व अपंगावस्थेतील प्राण्यांचे करीता योग्य ठिकाणी गायरान जमीनीवर अनाथालय/संगोपन केंद्र सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२१ विषय क्रमांक - ३९

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.अप्र/नि/जा/३४४/२०१२दि.८/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जगतगुरु तुकाराम महाराज यांचे पालखीचे दि.११/६/२०१२ ते १२/६/२०१२ रोजी आगमन होत आहे. पालखी आगमन वेळी भक्ती शक्ती उद्यान निगडी येथे स्वागत समारंभासाठी तसेच आकुर्डी विठ्ठल मंदीर येथे पालखी मूक्काम असलेने सदर दोन्ही ठिकाणी प्रकाश व्यवस्था व ध्वनीक्षेपण जनरेटर व्यवस्था दरवर्षी प्रमाणे करणे अत्यावश्यक आहे. व पालखी मुक्कामा ठिकाणी २४ तास प्रकाश व्यवस्था व सुरक्षिततेच्या दृष्टीने CCTV कॅमेरे ठेवणे आवश्यक आहे. त्याकरीता सदर ठिकाणी जनित्रसंच ठेवणे आवश्यक आहे. भक्ती शक्ती उद्याना जवळ पालखी आगमन व पालखी स्वागता करीता ध्वनीक्षेपण प्रकाश व जनरेटर व्यवस्था व आकुर्डी विठ्ठल मंदीर येथे पालखी मुक्काम दोन दिवसाकरीता ध्वनीक्षेपण जनरेटर CCTV व्यवस्था इ.काम त्वरीत तातडीने करावयाचे असल्याने सदरचे काम चालु निविदा

नोटीस क्र.२/२०/२०११-१२ अन्वये १९.४% कमी दराने चालु कामाचे ठेकेदार मे.मोरया मंडप डेकोरेटर्स यांचेकडुन करारनामा न करता करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. (अपेक्षित खर्च र.रु.२,५५,५१७/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२२ विषय क्रमांक - ४०

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भः- मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आर्किटेक पॅनेलवर पी.के.दास आणि असोसिएट्स यांना सन २०११ ते २०१४ या कालावधीकरता नेमणुक करणेस व पॅनेलच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करुन फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२३ विषय क्रमांक - ४१

दिनांक - १२/६/२०१२ विभाग - भूमि आणि जिंदगी

सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.जावेद शेख

संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भुजि/सर्व्हे -१,२/कावि/१५७/२०१२ दि.१२/६/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे म.न.पा.चे JNNURM अंतर्गत BSUP प्रकल्पासाठी विद्युत स्वीचींग स्टेशन उभारणे करीता म.न.पा.चे ताब्यातील प्रस्तावात नमुद जागा २९ वर्ष कालावधीसाठी म.रा.वि.वितरण कंपनीकडे विना मोबदला रितसर करारनामा करुन हस्तांतरीत करणेस तसेच त्यासाठीचे अ) मुद्रांक शुल्क र.रु.३,७३,६००/-, ब) नोंदणी फी र.रु.६४,३२०/-, क) कार्यालयीन पावती र.रु.१,५००/- हे नोंदणी शुल्क व मुद्रांक शुल्क BSUP (EWS प्रकल्प) या लेखाशिर्षातून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक - ६२४ विषय क्रमांक - ४२

दिनांक - १२/६/२०१२

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भः- मा.नवनाथ जगताप, मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव -

शाहूनगर येथिल व्यायाम शाळा हनुमान स्पोर्टस ॲकॅडमी या संस्थेस द.म.र.रु. २०००/- सेवा शुल्क तत्वावर ५ वर्षे कालावधी देण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.अविनाश टेकावडे                    अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके

बुधवार दिनांक १३/६/२०१२ दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----

मा.सभापती :- बुधवार दिनांक १३/६/२०१२ दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

**(जगदीश शेट्टी)**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०
सभावृत्तांत
(दिनांक १२.०६.२०१२ ची तहकूब सभा)

दिनांक - १३.०६.२०१२ वेळ - दुपारी १२:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दि.१२.६.२०१२ची तहकूब सभा बुधवार दिनांक १३.६.२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.जम सोनाली पोपट
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.पाडाळे निता विलास
८) मा.जावेद रमजान शेख
९) मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.भोसले राहुल हनुमंतराव
११) मा.चोंधे आरती सुरेश
१२) मा.भालेकर अरुणा दिलीप
१३) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

याशिवाय मा.प्रकाश कदम-अति.आयुक्त,मा.सावंत-सह आयुक्त, मा.टेकाळे, मा.पवार-सहा.आयुक्त,मा.घाडगे-मुख्यलेखापरिक्षक,मा.चाकणकर-प्र.नगरसचिव, मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.चव्हाण-सह शहर अभियंता, मा.दुधेकर,मा.इंगळे,मा.चिंचवडे,मा.ढगे,मा.जाधव,मा.जाधव,मा.कुदळे,मा.थोरात-कार्यकारी अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य.),मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पोमण-संगणक अधिकारी,मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.पवार-प्र.कायदा सल्लागार, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक -६२५ विषय क्रमांक - १०
दिनांक - १३/६/२०१२ विभाग - लेखा
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१३३६/१२ दि.४/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत तारखा विहित करणे आवश्यक असल्याने महापालिका आयुक्त यांनी महापालिकेचे अंदाजपत्रक कलम ९५ अन्वये दरवर्षी २० फेब्रुवारीपुर्वी मा.स्थायी समितीला सादर करावे, याप्रमाणे तारखा विहीत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

(मा.अतिरिक्त आयुक्त यांनी अंदाजपत्रकासंबंधीचे त्यांचे निवेदन प्रकट केले.)

ठराव क्रमांक -६२६ विषय क्रमांक - १६
दिनांक - १३/६/२०१२ विभाग - लेखा
सुचक :- मा.सोनाली जम अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/६/कावि/१३३७/१२दि.५/६/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मा.आयुक्त यांजकडून आलेले पिंपरी चिंचवड महापालिकेचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक “अ” व “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक कामीचे अंदाज/प्रस्ताव अवलोकन करणेत आले.

अंदाजपत्रक “अ”,“क”,“प” व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | १८,७६,२७,६८,३०० |
| २) | एकूण खर्च | १८,७१,८१,७३,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ४,४५,९४,९०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ४५४,५९,३५,३४७ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ४५४,५९,३५,३४७ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११३६,२६,६५,०३० |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ११३५,७७,८०,८५६ |
| ३) | अखेरची शिल्लक | ४८,८४,१७४ |

त्यानुसार मा.स्थायी समितीचे सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक "अ" व "क" तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे "प" अंदाजपत्रक त्याचप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे तयार करणेत येत असुन त्यास अंतिम स्विकृती देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

अंदाजपत्रक "अ","क","प" व जेएनएनयुआरएम अंदाजपत्रक

| अ.क्र. | तपशिल | सन २०१२-१३ चा अंदाज र.रु. |
|---|---|---|
| अ) १) | एकूण जमा | १८,७६,२७,६८,३०० |
| २) | एकूण खर्च | १८,७१,८१,७३,४०० |
| ३) | अखेरची शिल्लक | ४,४५,९४,९०० |
| ब) १) | भाग-३ एकूण जमा | ४५४,५९,३५,३४७ |
| २) | भाग-३ एकूण खर्च | ४५४,५९,३५,३४७ |
| क) १) | जेएनएनयूआरएम एकूण जमा | ११३६,२६,६५,०३० |
| २) | जेएनएनयूआरएम एकूण खर्च | ११३५,७७,८०,८५६ |
| ३) | अखेरची शिल्लक | ४८,८४,१७४ |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(जगदीश शेट्टी)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/८९६/२०१२
दिनांक - १५/०६/२०१२ चे लगत

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.